# बाणगंगाच्या ऐतिहासिक वारशाचे नुकसान

■ कंत्राटदाराविरोधात एफआयआर दाखल ■ मंत्री लोढा यांच्या निर्देशानंतर दुरुस्तीचे काम पूर्ण

**मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी**

ऐतिहासिक अशा 'बाणगंगा तलाव व परिसर पुनरुज्जीवन प्रकल्पा'अंतर्गत कामे करताना तलावाच्या उत्तर प्रवेशद्वारावरून आतमध्ये 'एक्सकॅव्हेटर' संयंत्र उतरवून तलावांच्या पायऱ्यांची हानी केल्याबद्दल संबंधित कंत्राटदाराला महापालिकेच्यावतीने 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, तलावाला हानी पोहोचवून नुकसान केल्याबद्दल मलबार हिल पोलीस ठाण्यात प्रथम माहिती अहवालदेखील दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, हानी पोहोचलेल्या पायऱ्या दुरुस्त करण्याची कामे पूर्ववत करण्यात आली आहेत, अशी माहिती मुंबई महापालिकेने दिली आहे.

बाणगंगा ही पुरातन वास्तू आहे. अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे तलावाच्या पायऱ्या, पायऱ्यांचे दगड, दीपस्तंभांची दुरवस्था झाली होती. तसेच, तलाव परिसरात पायऱ्यांवरील बांधकामे झाली होती. यांमुळे, राज्य शासनाच्या स्तरावर झालेल्या बैठकांनुसार तसेच राज्याचे कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता मंत्री आणि स्थानिक आमदार तथा मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या



निर्देशानुसार महापालिकेमार्फत बाणगंगा तलाव व परिसर पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प महापालिकेचा विशेष प्राधान्य प्रकल्प म्हणून घोषित करून महापालिकेने त्यासाठी निविदाप्रक्रिया राबवली. निविदाप्रक्रियेअंती पुरातन वारसा कामे (हेरिटेज) कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली.

तसेच, प्रारंभी गाळ काढण्यासाठी हस्तसंचलित यंत्रणा उभी करण्यात येऊन गाळ काढण्यात येत होता. तथापि, कंत्राटदाराने सोमवार, दि. २४ जून रोजी 'एक्सकॅव्हेटर' संयंत्र बाणगंगा तलावाच्या उत्तर दिशेच्या प्रवेशद्वाराने, ती मिळताच 'डी' विभागाने हे काम



थांबविले. तसेच, हे संयंत्र बाहेर काढले आहे. दरम्यान, बाणगंगा प्रकल्पाचे कंत्राटदार 'मे. सवानी हेरिटेज कन्झर्वेशन प्रायव्हेट लिमिटेड' यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच, मलबार हिल पोलीस ठाणे येथे प्रथम माहिती तक्रार (क्रमांक FIR-CR No.१५५/२०२४ Dt.२५/०६/२०२४) दाखल करण्यात आला आहे.

शिवाय, संयंत्रामुळे हानी पोहोचलेल्या पायऱ्या दुरुस्त करण्याची कामे तत्काळ हाती घेण्यात आली. हानी पोहोचलेल्या पायऱ्या व काढून ठेवलेले दगड यांची पुनर्स्थापना करण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून पूर्ववत स्वरुपात ते काम झाले आहे. याप्रकरणी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच, उर्वरित कामेदेखील पुढच्या काळात नियमितपणे सुरू ठेवण्यात येणार आहेत, असे महापालिका प्रशासनाच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, मंत्री लोढा यांनी अशाप्रकारची कोणतीही घटना घडू नये, यासाठी स्थानिकांची एक कमिटीदेखील स्थापन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगितले. तसेच, ''ही कमिटी पुढे होणाऱ्या कामकाजावर देखरेख करेल. संपूर्ण घटनेची तपासणी करण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांची कमिटी स्थापन होणार असून ही कमिटी पुढील १५ दिवसांत अहवाल सादर करेल. मुंबईतील ऐतिहासिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आम्ही नेहमीच तत्पर राहू,'' अशी ग्वाही मंत्री लोढा यांनी यावेळी दिली आहे.

### या पुनरुज्जीवन प्रकल्प अंतर्गत विविध कामे

- बाणगंगा तलावातील दगडी पायऱ्यांची सुधारणा करणे.
- बाणगंगा तलाव परिसरातील दीपस्तंभांचे पुनरुज्जीवन करणे.
- बाणगंगा तलावामध्ये आकर्षक विद्युत रोषणाई करणे.
- बाणगंगा तलावाच्या दगडी पायऱ्यांवरील अतिक्रमण हटविणे.
- रामकुंड या ऐतिहासिक व पवित्र स्थळाचे पुनरुज्जीवन करणे.
- बाणगंगा परिसरातील मंदिरांचा सर्वंकष विकास आराखडा तयार करणे व योजनाबद्ध पद्धतीने रुपरेषा ठरविणे.
- बाणगंगा तलावाकडे जाण्यासाठी असलेल्या रस्त्यांची सुधारणा करणे.
- दीपस्तंभांची दुरुस्ती करण्यात आली आहे.



**मुंबई** : अभ्युदय को. ऑ. बँक लि. (लोअर परळ शाखा) यांच्या '६०व्या वर्धापन दिना'निमित्त 'बृहन्मुंबई वृतपत्र विक्रेता संघा'चे विश्वस्त राजन पेढूरकर, उपाध्यक्ष प्रकाश कानडे, मनोहर परब, सुहास नलावडे, प्रदीप सावर्डेकर यांनी बँक प्रबंधक सुजाता गायकवाड यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड**

**सीआयएन:** एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
**नोंदणीकृत कार्यालय:** रिजन्ट चेंबर्स, ७ वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी: २२८२ २७०८/६९८२९०००
**वेबसाइट:** www.vinylchemicals.com

**नोटिस**

**कंपनीच्या समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन व प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ ॲथॉरिटी) मध्ये हस्तांतरण करणे**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, इन्व्हेस्टर एज्युकेशन व प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ ॲथॉरिटी) (अकौन्टिंग, ऑडिट, ट्रान्सफर व रिफंड) नियम, २०१६ (नियम), सुधारित, सोबत वाचले असता कंपनी कायदा, २०१३ (कायदा) मधील कलम १२४ मधील तरतुदीं अंतर्गत कंपनीच्या ज्या वित्तीय वर्ष २०१६-१७ दरम्यान घोषित इक्विटी समभागांच्या संदर्भात ओळीने सात वर्ष किंवा अधिक काळ लाभांशाचा दावा न केलेला किंवा देण्यात आलेला नाही असे इक्विटी समभाग कंपनीला आयईपीएफ ॲथॉरिटीच्या डिमॅट खात्यात हस्तांतरित करावे लागतात.

ज्यांचे शेअर्स आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांना त्यांच्या दावा न केलेल्या लाभांशांवर दावा करण्याचा सल्ला देणाऱ्या स्वतंत्र नोटिसा कंपनीने संबंधित भागधारकांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठवलेल्या आहेत. कंपनीने अशा भागधारकांचा तपशील तिच्या www.vinylchemicals.com या वेबसाइटवर अपलोड केलेला आहे. आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र असणाऱ्या, अशा दावा न करण्यात आलेल्या लाभांशांच्या आणि शेअर्सच्या तपशीलाची पडताळणी करण्यासाठी संबंधित भागधारकांना सदर वेबसाइटचा संदर्भ घेण्याची विनंती करण्यात येत आहे.

वित्तीय वर्ष २०१६-१७ आयईपीएफ मध्ये हस्तांतरीत करण्यात येण्यापूर्वी ज्यांच्यावर दावा करण्यात आला नव्हता किंवा ते प्रदान करण्यात आले नव्हते, दावा करण्याची संबंधित भागधारकांना विनंती करण्यात येते.

वास्तविक स्वरूपात भागधारणा करणारे आणि ज्यांचे शेअर्स हे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी पात्र आहेत अशा संबंधित भागधारकाने (भागधारकांनी) नोंद घ्यावी की त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ शेअर सर्टिफिकेट (सर्टिफिकेट्स) हे स्वयचंलितपणे रद्द होईल आणि वाटाघाटीयोग्य नसल्याचे (नॉन-नेगोशिएबल) मानण्यात येईल. शेअर्स डिमॅट स्वरूपात धारण करण्यात येण्याच्या बाबतीत, शेअर्स हस्तांतरीत करण्यासाठी पात्र असण्याच्या मर्यादेपर्यंत, ते भागधारकांच्या खात्यातून डेबिट करण्यात येतील आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात येतील.

**संबंधित भागधारकांनी २३ सप्टेंबर, २०२४ रोजी किंवा त्यापुर्वी त्यांच्या लाभांशाचा दावा न केल्यास, नियमांचे पालन करण्याच्या दृष्टीकोनातून कंपनी, भागधारकांना कोणतीही पुढील सूचना न देता सदर समभागांचे आयईपीएफ ॲथॉरिटी यांचेकडे हस्तांतरण करेल आणि सदर हस्तांतरित केलेल्या समभागांच्या बाबतीत कंपनीपाशी कोणतीही दायित्व नसेल.**

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की आयईपीएफ प्राधिकरणाकडे शेअर्स हस्तांतरीत करण्यात आल्यावर, यामध्ये अशा शेअर्सवर उपार्जित होणारे सर्व लाभ समाविष्ट, जर असल्यास, नियमांतर्गत विहित करण्यात आल्याप्रमाणे फॉर्म आयईपीएफ-५ मध्ये आयईपीएफ प्राधिकरणाकडे अर्ज करून केवळ आयईपीएफ प्राधिकरणाकडे सदरकरिता दावा करण्यात येऊ शकतो आणि आयईपीएफ वेबसाइटवर म्हणजेच www.iepf.gov.in वर सदर उपलब्ध करून देण्यात येईल.

वरील संदर्भात काही चौकशी करायची असल्यास, भागधारकांनी कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजन्ट, लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि. यांच्याशी सी-१०१, १ला मजला, २४७ पार्क, लाल बहादुर शास्त्री मार्ग, विक्रोली (प.), मुंबई-४०००८३, ईमेल: csg-unit@linkintime.co.in किंवा कंपनीचा ईमेल cs.vinylchemicals@pidilite.com येथे संपर्क साधावा.

**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड करिता**
**पी.सी. पटेल**
सेक्रेटरी

ठिकाण : मुंबई
दिनांक : २६/०६/२०२४

## 'दुर्गजिज्ञासा' ग्रंथ महाराष्ट्राच्या स्मरणात राहील : मुख्यमंत्री



**मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी**

नवसंशोधक प्रदीप पाटील यांनी 'दुर्गजिज्ञासा' हा ग्रंथ दि. १८ जून रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेट दिला. सातारा जिल्ह्यातील २४ किल्ल्यांचा संदर्भरुपी इतिहास, अचूक नकाशे, अवशेषांचे असा दस्तैवज असलेला हा ४४४ पानांचा ग्रंथ आहे. या ग्रंथाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ''नऊ वर्षांच्या अथक परिश्रमातून साकारलेला हा ग्रंथ महाराष्ट्राच्या नेहमी स्मरणात राहील. त्याचबरोबर, नवसंशोधनासाठी महाराष्ट्र शासन तुमच्या पाठीशी आहे,'' अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी प्रदीप पाटील यांचे कौतुक केले.

दरम्यान, ''ग्रंथाचा आवाका पाहून शासकीय दरबारी याची नक्की नोंद घेतली जाईल,'' असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले. मंत्री शंभूराजे देसाई यांनी पुढाकार घेऊन मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी या नवसंशोधकाची भेट मुख्यमंत्र्यांसोबत घडवून आणली.

### 'दुर्गजिज्ञासा' या ग्रंथाची वैशिष्ट्ये

- संशोधनात्मक आणि गड-किल्ले संवर्धनास उपयुक्त
- सातारा जिल्ह्यातील २४ किल्ल्यांचा संदर्भरुपी इतिहास, अचूक नकाशे स्थापत्याची रेखाटने
- ऐतिहासिक पत्रे, बखरी, ग्रंथ यांचा यथासार मागोवा घेत गडकोटांना घटनावलीतून जीवंत करणे.
- गडाची आजची अवस्था नेमकी कशी आहे? यासाठी तेथील वास्तूची सप्रमाण मोजमाप.
- भविष्यात हीच आरेखने पुरातत्व खाते, शासन, गडप्रेमी इत्यादींना उपयोगी ठरणार.
- इतिहासातील गड नेमका कसा होता, याची स्पष्ट कल्पना हा ग्रंथ इतिहासप्रेमींना देईल.

## तत्कालीन रेल्वे पोलीस आयुक्त कैसर खालिद यांचे निलंबन

**घाटकोपर होर्डिंग दुर्घटना**

**मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी**

घाटकोपर येथे पेट्रोल पंपावर दि. १३ मे रोजी होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी तत्कालीन रेल्वे पोलीस आयुक्त आयुक्त कैसर खालिद यांना निलंबित करण्यात आले आहे. सध्या ते अतिरिक्त पोलीस महासंचालक (मानवाधिकार संरक्षण) या पदावर कार्यरत होते.

राज्याच्या गृह विभागाने मंगळवार, दि. २५ जून रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अधिकारी मो. कैसर खालिद यांना पुढील आदेश येईपर्यंत तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात येत आहे. ज्या कालावधीसाठी हा आदेश अंमलात राहील, त्या कालावधीत, निर्वाह भत्ता, महागाई भत्ता आणि देय असलेले इतर भत्ते अदा केले जातील. यासाठी त्यांना इतर कोणत्याही ठिकाणी नोकरी, व्यवसाय किंवा व्यवसायात गुंतलो नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

निकषांकडे दुर्लक्ष करून १२० बाय १४० चौरस फूट आकाराचे मोठे होर्डिंग्ज उभारण्यास परवानगी देऊन आपल्या अधिकारांचा गैरवापर केल्याचा ठपका खालिद यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

### तपासात धक्कादायक बाबी समोर

- रेल्वे पोलिसांना ४०० टक्के अधिक नफ्याचे आमिष दाखवत 'इगो प्रायव्हेट लिमिटेड'च्या माजी संचालिका जान्हवी मराठे यांनी घाटकोपर होर्डिंगचे कंत्राट मिळविले.
- अनेक महत्त्वाच्या पत्रव्यवहारांत मराठे यांच्या स्वाक्षऱ्या असलेली कागदपत्रे विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) हाती लागली.
- होर्डिंगच्या कंत्राटासाठी दि. ९ नोव्हेंबर २०२२ रोजी तत्कालीन रेल्वे पोलीस आयुक्तांशी केलेल्या पत्रव्यवहारावर मराठे यांची स्वाक्षरी आहे.

## दिव्यांग प्रवाशांसाठी पश्चिम रेल्वेची ११ कोटींची गुंतवणूक

**मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी**

पश्चिम रेल्वेने प्रवाशांच्या सुविधा वाढविण्याच्या तसेच त्यांच्या एकूण प्रवासाचा अनुभव सुधारण्याच्या उद्देशाने अनेक प्रवासीकेंद्रित कामांसाठी २ हजार, २०६ कोटींची सर्वसमावेशक योजना जाहीर केली आहे. या योजनेत दिव्यांगांसाठी ११ कोटींहून अधिक खर्चाच्या सुविधांचा समावेश आहे.

पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, पश्चिम रेल्वेचे ११.७ कोटी खर्चासह दिव्यांगांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. या अंतर्गत अनेक कामांचे नियोजन करण्यात आले आहे. ज्यात प्रमुख स्थानकांवर 'रॅम्प' आणि 'रेलिंग'ची स्थापना यांचा समावेश आहे. ज्यामुळे 'व्हीलचेअर' वापरकर्ते आणि हालचाल कमकुवत असलेल्या प्रवाशांना सहज हालचाल करता येईल. दिव्यांग प्रवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी खास रचना असलेली शौचालये आणि पिण्याच्या पाण्याचे बूथ, तसेच स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ आरक्षित पार्किंगची जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दृष्टिहीन प्रवाशांच्या सोयीसाठी ३९ स्थानकांवर 'ब्रेल' चिन्हे अंकित करण्यात आली आहेत. अशा प्रवाशांना स्थानकांवर सुरक्षितपणे 'नेव्हिगेट' करण्यास मदत करण्यासाठी स्पर्शिक मार्गदेखील प्रदान करण्यात आले आहेत. सर्व उपनगरी नसलेल्या स्थानकांवर एकूण ८६ 'व्हीलचेअर' उपलब्ध आहेत. उपनगरीय स्थानकांवर, प्रत्येक फलाटावर एक 'व्हीलचेअर'ची तरतूद करण्यात आली आहे. २४ स्थानकांवर ६९ लिफ्ट आधीच उपलब्ध आहेत. तसेच, १३ अतिरिक्त 'लिफ्ट'चे काम वेगाने सुरू आहे.

## तिकीट 'कन्फर्म' करूनच करा रेल्वे प्रवास

### प्रतीक्षेतील तिकीट यापुढे अमान्य

**मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वेने प्रवाशांसाठी एक महत्त्वाची सूचना जारी केली आहे. त्यानुसार आता 'वेटिंग' तिकीट घेऊन प्रवास करणाऱ्यांना मध्येच उतरवले जाईल. विशेषतः लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये ही सूचना लागू करण्यात आली आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या निर्णयाचा मुख्य उद्देश ट्रेनमधील गर्दी कमी करणे आणि जास्तीत जास्त प्रवाशांना जागा उपलब्ध करून देणे हा आहे. 'वेटिंग' तिकीट घेऊन प्रवास करणाऱ्यांना आधीच ताकीद देण्यात आली आहे की, त्यांची तिकिटे वैध मानली जाणार नाहीत. असे असूनही, जर एखादा प्रवासी 'वेटिंग' तिकिटासह पकडला गेला, तर त्याला प्रवासात मध्येच उतरवून दिले जाईल.

मुंबईहून उत्तर भारतात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये बहुतांश प्रवासी 'वेटिंग' तिकिटांवर प्रवास करतात. अशा स्थितीत अवैध 'वेटिंग' तिकीटावर अचानक प्रवास केल्याने रेल्वेतील गर्दी वाढते. या पार्श्वभूमीवर, यापुढे आरक्षित डब्यांमध्ये 'वेटिंग' तिकिटावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर रेल्वे प्रशासनाकडून कडक कारवाई करण्यात येत आहे. अलीकडच्या काही दिवसांत मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील २९ मेल-एक्स्प्रेस गाड्यांच्या आरक्षित डब्यांमधून 'वेटिंग' तिकीट असलेल्या एक हजार, ६२८ प्रवाशांना उतरवण्यात आले आहे.

या मोहिमेंतर्गत रेल्वे सुरक्षा दल आणि तिकीट तपासनीस यांच्या पथकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. ते ट्रेनच्या विविध स्थानकांवर तपासणी करतील आणि तिकीट प्रतीक्षेत असलेल्या प्रवाशांना त्वरित ट्रेनमधून उतरण्यास सांगितले जाईल. रेल्वेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, ''प्रवाशांची सुरक्षितता आणि सुविधा लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवासादरम्यान त्यांना कोणतीही अडचण येऊ नये, म्हणून सर्व प्रवाशांनी निर्धारित तिकीट घेऊनच प्रवास करावा, अशी आमची इच्छा आहे.''



## मध्य रेल्वेकडून १.५५ घनमीटर गाळ काढल्याचा दावा

**मुंबई** : पावसाळ्यात विनाविलंब आणि विनाअडथळा लोकल वाहतूक सुरू राहावी, यासाठी रेल्वे प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. याच पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे टीमने मे व जून महिन्यांत १.५५ लाख घनमीटर गाळ काढला असल्याचा दावा केला आहे. पावसाळ्यात रेल्वेगाड्या सुरळीत चालवण्यामध्ये येणारे आव्हान म्हणजे रेल्वेरूळांवर स्वच्छता राखणे हे आहे. रेल्वेरूळांवर टाकण्यात आलेला कचरा आणि गाळ यामुळे रूळांनाच धोका निर्माण होत नाही, तर यामुळे रेल्वेरूळाखाली जाणारे नालेदेखील तुंबतात. यामुळे पावसाळ्यात रेल्वेरूळांवर पाणी साचते. हे लक्षात घेता, मध्य रेल्वेचा मुंबई विभाग हा गाळ आणि कचरा हटविण्यासाठी २४ तास अथकपणे काम करत आहे, जेणेकरून पावसाळ्यात रेल्वेरूळ गाळ आणि कचरामुक्त असतील.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

थोर कल्याणकारी लोकराजाला जयंतीनिमित्त मानाचा मुजरा!



२६ जून
राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - महाराष्ट्र शासन

डीजीआयपीआर/२०२४-२५/D४६०